# कै. सौ. सरोजनीदेवी वि. पाटील पुण्यातिथी



कोल्हापूर; ता. २३- ताराराणी विद्यापीठात विविध शाखातर्फे विद्यापीठाच्या माजी उपाध्यक्षा कै. सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथराव पाटील तथा पूज्य काकी यांची २० वी पुण्यतिथी सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज कराडच्या मराठी विषय प्राध्यापिका डॉ. सुमन पाटील यांच्या उपस्थितीत व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. व्ही. टी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. विविध शाखात गुरुपौर्णिमा साजरी केलेनंतर पूज्य काकींच्या प्रतिमेचे पुष्पहार समर्पण आरती असे विविध उपक्रम संपन्न झालेवर दुपारी ४ वा. शारदा मंदिरात संपन्न कार्यक्रमात डॉ. सुमन पाटील म्हणाल्या "१९ व्या शतकानंतरच्या कर्तृत्ववान स्त्रिया जाणून घ्यायच्या असतील तर पूज्य काकींचे नांव घ्यावे लागेल. दैदिप्यमान विचारधारा घेऊन स्थापन झालेले हे विद्यापीठ खरोखरच भूषणावह आहे असे म्हणावेसे वाटते." यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या शुभ हस्ते गरजू मुलींना गणवेष वाटण्यात आले. पूज्य काकींची आवडती भजने, सद्गुरू दत्ताची भजने प्रतिमापूजा आरती असा भावपूर्ण समारंभ संपन्न झाला. संचलन श्रीमती जयश्री पाटील व समारोप श्रीमति माडगूळकर यानी केला.

सत्यवादी
24/7/89